# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 03/10/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## घरफोडी

**पो.स्टे. खापा** :— अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील मौजा वाकी येथे दिनांक ०१/१०/२०२३ चे १८.०० वा. ते दिनांक ०२/१०/२०२३ चे १४.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— मोरेश्वर गणपत गोंडुळे, वय ७३ वर्ष, रा. वाकी सावनेर हे दिनांक ०१/१०/२०२३ रोजी सायंकाळी ०६/०० वा. दरम्यान फिर्यादी व त्याची पत्नी, नातु असे मिळुन मोटरसायकलने धापेवाडा येथे सासऱ्याचे घरी गेले होते रात्रीला मुक्काम केला व दिनांक ०२/१०/२०२३ रोजी दुपारी ०२/३० वा. घरी पोचले तर फिर्यादीचे घराचे दाराचे कुलुप दिसले नाही दार उघडून आतमध्ये पाहणी केली असता आतमधल्या खोलीमधील गोदरेजचे कपाट उघडे दिसले आणि कपाटातील कपडे व कागदपत्रे अस्ताव्यस्त पडलेले दिसले आरमारी मधिल लॉकरमधील ठेवलेले पर्समधील १) काळया मण्याची व सोन्याची पदक असलेली २ मंगळसुत्र प्रत्येकी ९ ग्रॅम सोन्याची असे एकुण १८ ग्रॅम जुनी किंमती ४५०००/— रू २) ५ ग्रॅम सोन्याची बादामी अंगठी ५ ग्रॅम सोन्याची साईबाबा असलेली अंगठी किंमती २५०००/— रू. ३) २ ग्रॅम वजनाचे सोन्याचे बिऱ्या किंमती ५०००/— रू ४) १० तोळयाचे चांदीची पायपट्टया किंमती ३०००/— रू. असा एकुण ७८०००/— रूपयाचा मुद्देमाल अज्ञात चोरटयांनी चोरून नेला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लोंदे मो. नं. ९३७०३२१६९५ हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक ०१/१०/२०२३ रोजी ११/३० वा. दरम्यान फिर्यादी आपले चहाचे दुकाण बंद करित असता तिचे दुकानात एक मुलगा आला तो फिर्यादीला म्हणाला मला चहा दे फिर्यादीने त्याला म्हटले दुकान बंद करत आहे मी चहा देत नाही असे म्हणताच त्या मुलाने फिर्यादीचे खांदयावर हात ठेवुन फिर्यादीचा हात पकडला व फिर्यादीच्या अंगाला हात लावला तेव्हा फिर्यादी जोराने ओरडली तेव्हा तिचे दुकाणात काम करणारा मुलगा हा आला त्याला म्हटले कि, तु कोण आहे तु कशासाठी आला व त्याला हातभुक्क्याने मारपीट केली तिथे हजर लोकांना माहीत पडले कि, तो मुलगा आशिशि विठ्ठल जुनघरे, वय २६ वर्ष रा. व्याहाळपेठ आहे. आशिष जुनघरे याने फिर्यादीच्या अंगाला स्पर्श करून फिर्यादीचा हात पकडला व फिर्यादीच्या शरीराला स्पर्श करून लज्जास्पद वर्तणुक केल्याने लैगिक छळवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ (अ), ३२३, ५०४, ५०६ भांदवि. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक संजय वानखेडे पोस्टे कळमेश्वर हे करीत आहे.

## सावनेर पोलीसांनी अवैध जनावरांची वाहतुक करणाऱ्या आरोपीतांना पकडून जनावरांना दिले जिवनदान

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत १० कि. मी. अंतरावरील रेल्वे क्रॉसिंग जवळ खापा पाटणसावंगी सावनेर येथे दिनांक ०२/१०/२०२३ चे ०९.०० वा. ते ०९.३० वा. दरम्यान सावनेर पोलीस पथक पेट्रोलींग करीत असतांना त्यांना गुप्त माहिती मिळाली की, एक इसम विनापरवाना व अवैधरीत्या जनावरांना निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरुन सावनेर पोलीस पथकाने तात्काळ घटनास्थळी जावून नाकाबंदी करुन आरोपी क्र. ०१) नामे– १) जितेन्द्र द्वारका प्रसाद मरकाम वय २८ वर्ष हा आपले ताब्यातील बोलेरो पीकअप गाडी क्र. एम. पी–०५/जी–७८८१ मध्ये ४ म्हशी तसेच आरोपी क्र. २) नामे– अंकीत कल्लु मेहदुले वय २३ वर्ष याचे ताब्यातील बोलेरो क्र. पीकअप गाडी एम. एच–३३/डी–२२३१ वाहनामध्ये ३ म्हशी व हेला असा वाहनामध्ये बेकायदेशिररित्या म्हशी व हेल्याचा पायाला तोंडाला दोरीने बांधुन निर्दयतेने कोंबुन वाहतुक करीत असतांना मिळुन आल्याने त्याचे ताब्यातुन एकुण म्हशी व हेल्याची प्रत्येकी २००००/–रू प्रमाणे १,६०,०००/–रू तसेच वाहनाची किंमत ६००,०००/–रू प्रमाणे असा एकुण १,२०,०००/–रूपयाचा मुद्देमाल गोणेकर रा. राहना यांचे सांगण्याप्रमाणे वाहनामध्ये बेकायदेशीररित्या म्हशीचा व हेल्याच्या पायाला, तोंडाला दोरीने बांधुन निर्दयतेने कोंबुन वाहतुक करतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी सरकारतर्फे फिर्यादी पोलीस हवालदार बंडु कोकाटे पोस्टे सावनेर यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ११(१) (ड) प्रा.छ.प्रती.का. सहकलम १०९ भा.द.वी काद्ययान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना सुचनापत्रावर रिहा करण्यात आले असुन गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार योगेश झोडापे, पोस्टे सावनेर मो. नं. ८६६८८४४६२३ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरी

**१) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील बेलेकर लेआउट प्रायमरी शाळेजवळ वार्ड क्र. ११ कळमेश्वर येथे दिनांक ०१/१०/२०२३ चे १०.०० वा. ते दिनांक ०२/१०/२०२३ चे सकाळी ०६.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– गिरीधर चिंतामण श्रीखंडे, वय ६१ वर्ष, रा. बेलेकर लेआउट प्रायमरी शाळेजवळ वार्ड क्र. ११ कळमेश्वर याने दिनांक ०१/१०/२०२३ ला रात्री १०/०० वा. दरम्यान पॅशन प्रो मोटारसायकल क्र. एम. एच ४०/ए. डी.– ६९३२ काळया रंगाची ही अंगणात उभी करून ठेवली व रात्री घरीच आराम केला व दुसऱ्या दिवशी दिनांक ०२/१०/२०२३ रोजी सकाळी ६/०० वा. दरम्यान पाहली असता दिसली नाही आजुबाजुला शोध घेतला मिळाली नाही पॅशन प्रो मोटारसायकल क्र. एम. एच.–४०/ए. डी.– ६९३२ काळया रंगाची किंमती १५,०००/– रू. ची अंगणात ठेवलेली मोटरसायकल कोणीतरी अज्ञात चोरांनी चोरून नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कळमेश्वर येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोहवा करपाते पोस्टे कळमेश्वर हे करीत आहे.

**२) पो.स्टे. रामटेक** :— अंतर्गत ०७ कि. मी. अंतरावरील मनसर येथे दिनांक ०१/१०/२०२३ चे १५.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— लिलाधर विजय मनघाटे, वय ३० वर्ष रा. मनसर ता. रामटेक हे नाईट डयुटी करुन घरी आले व स्वतःची हिरो कंपनीची ब्लॅक रेड रंगाची आय स्मार्ट मोटरसायकल क्रमांक एम. एच.— ४०/ऐ वाय.—२४५६ नेहमीच्या ठिकाणी लावून ठेवली व घरामध्ये जावून आंघोळ, जेवन वैगरे करुन आराम केला काही वेळाने डयुटीवर जाण्याकरीता बाहेर आले तर त्या ठिकाणी फिर्यादीची मोटरसायकल क्रमांक एम. एच. ४०/ए. वाय.—२४५६ किंमती ४०,०००/—रु. ही दिसुन आली नाही. आजुबाजुला शोध घेतला मिळुन आली नाही. कोणीतरी अज्ञात चोराने फिर्यादीची मोटरसायकल चोरुन नेली आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. रामटेक येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास नापोशी डोकीरमारे मो. क्र. ९७६४२८५९८८ हे करीत आहे.

## मोटरसायकल चोरीचा प्रयत्न

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत तार बाजार काटोल येथे दिनांक ०२/१०/२०२३ चे १९.१५ वा. ते १९.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे— प्राचीत प्रविन वानखेडे, वय १८ वर्ष, रा. खानगाव काटोल हा आलीशान स्वामी काटोल या कपडयाच्या दुकानात काम करतो. फिर्यादीने सकाळी १०/०० वा. दरम्यान त्याचे वडीलाची मोटरसायकल हि दुकानासमोर ठेवली असता सायंकाळी १९/३० वा. दरम्यान गावातील रूषभ गायकवाड याने फिर्यादीस दुकानात येउन सांगीतले की तुझी मोटरसायकल दोन अनोळखी ईसम घेउन जात आहे. तेव्हा फिर्यादीने बाहेर येउन बघितले असता एक ईसम हा त्याची मोटरसायकल घेउन जात असता फिर्यादीने त्यास पकडले नमुद आरोपी नामे— मिलींद सुरेश गायकवाड, रा. सटवामाता मंदिरजवळ सावनेर ता. सावनेर याने फिर्यादीची मोटरसायकल क्र. एम. एच. —४०/ए. सी. —६३५० ही चोरून नेण्याचा प्रयत्न केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, ५११ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास महिला पोलीस नायक वंदना पो.स्टे. काटोल मो. नं. ९९२२५६१८४६ या करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**